


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३३० वा शनिवार दि २८ मार्च २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# खरात प्रकरणात राजकीय नेते, बड्या अधिकाऱ्यांचेही व्हिडिओ असल्याचा आरोप फडणवीसांनी सभागृहात दिलं उत्तर

वृत्तसंस्था/मुंबई

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरून विधानसभेत सोमवारी मोठा गदारोळ झाला. या प्रकरणातील कोणालाही ङ्गक्लीन चिटफ दिली जाणार नाही, तसेच दोषींना कुठल्याही परिस्थितीत सोडणार नाही अशी स्पष्टोक्ती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. शिवाय या संपूर्ण प्रकरणावर आज, मंगळवारी सभागृहात सविस्तर निवेदन करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. स्थगन प्रस्तावाद्वारे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी हा मुद्दा उपस्थित करत सरकारला धारेवर धरले. अशोक खरात याच्याशी संबंधित १००हून अधिक व्हिडीओ क्लिप समोर आल्याचा दावा त्यांनी केला. या क्लिपमध्ये राजकीय व्यक्ती, आयएएस, आयपीएसफ तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचा आरोप करत संबंधित सर्वांच्या कॉल डिटेल रेकॉर्ड्स (सीडीआर) तपासण्याची मागणी त्यांनी केली. यानंतर आमदार भास्कर जाधव आणि नाना पटोले यांनीही सरकारवर जोरदार टीका करत या प्रकरणामुळे राज्याची बदनामी झाल्याचे सांगितले. ङ्गहा महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेचा प्रश्न असून, यावर सविस्तर चर्चा झाली पाहिजेफ, अशी मागणी विरोधकांनी केलीदरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात हस्तक्षेप करत हे प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे नमूद केले. आध्यात्माच्या नावाखाली महिलांची फसवणूक करून त्यांच्यावर अत्याचार, दुष्कृत्ये झाल्याचे समोर येत असल्याचे त्यांनी सांगितले. पोलिसांनी याप्रकरणी सक्रियपणे कारवाई सुरू केली असून, सुरुवातीला तक्रार देण्यास घाबरणाऱ्या महिलांना धीर दिल्यानंतर आता त्या पुढे येत असल्याची माहिती त्यांनी दिली. ही कारवाई अचानक झालेली नसून आधीपासूनच तयारी सुरू होती. आरोपीच्या अटकेपूर्वीच १० मार्च रोजी दुसऱ्या जिल्ह्यातील एका तक्रारीचा वापर करून आवश्यक ती एलओसी मिळविण्यात आली होती. त्यामुळे त्याला बाहेर पळता आले नाही, असेही फडणवीस यांनी सांगितले. या प्रकरणाचा तपास सुरू आहे. त्यामुळे याबाबतची सविस्तर माहिती आज, मंगळवारी सभागृहासमोर मांडण्यात येईल, असे फडणवीस म्हणाले.



माझ्यात वेगळी शक्ती आहे, असे महिलांना सांगून त्यांचा दुरुपयोग करणे आणि त्या जे काही समर्पण करत आहेत, तेच त्यांचे इतिकर्तव्य आहे, अशा पद्धतीने त्यांचे ब्रेन वॉशिंग करणे, अशा अनेक गोष्टी यामध्ये झाल्या आहेत, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. दरम्यान, या प्रकरणात गुन्हा दाखल झाला असून, तपास सुरू असल्याची माहिती विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली. मात्र, विरोधकांच्या आक्रमक भूमिकेमुळे सभागृहात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

---

# रूपाली चाकणकरांचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा, अशोक खरात प्रकरणावरून दुसरा धक्का

वृत्तसंस्था/ पुणे

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. अशोक खरातसोबतचे व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर रूपाली चाकणकर यांनी आधीच राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. वैयक्तिक कारणास्तव राजीनामा देत आहे, असे त्यांनी त्यावेळी सांगितले होते. मात्र, आता त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा दिल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. भोंदू बाबा अशोक खरातला गुरू मानणे रूपाली चाकणकर यांना चांगलेच महागात पडले आहे. विविध स्तरांतून त्यांच्यावर टीका होत होती. पक्षातील अनेकांनी चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी राष्ट्रवादीच्या नेत्या सुनेत्रा पवार यांच्याकडे केली होती. अखेर वाढता दबाव लक्षात घेता, चाकणकर यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. रूपाली चाकणकर यांनी सुनेत्रा पवार यांना पत्र लिहून आपला राजीनामा सोपवला आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, ङ्गमी माझ्या राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे, त्याचा आपण स्वीकार करावा.राजीनाम्यासोबतच त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना ही सर्व परिस्थिती वेदनादायक असल्याचे नमूद केले. चाकणकर यांनी पत्रात पुढे म्हटले की, खरात प्रकरणाबाबत मी पहिल्या दिवसापासूनच माझी भूमिका स्पष्ट केली आहे. त्याच्या कोणत्याही आर्थिक व्यवहारात किंवा गैरकृत्यात माझा दुरान्वये संबंध नाही. आजही मी माझ्या भूमिकेवर ठाम आहे आणि तपासादरम्यान या सर्व बाबी स्पष्ट होतीलच. कोणतेही पुरावे नसताना केवळ माध्यमांमधून होणारे खोटे आरोप वेदनादायक आहेत. सत्य लवकरच सिद्ध होईल. या प्रकरणाचा तपास निष्पक्ष आणि पारदर्शक व्हावा, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पोलीस महासंचालकांकडे यापूर्वीच केली आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर चाकणकर यांनी आपली बाजू मांडली होती. ङ्गमी अशोक खरातला गुरू मानले हे खरे आहे, मात्र त्याच्या कृत्यांची मला कल्पना नव्हती. जेव्हा हे सर्व समजले, तेव्हा त्याच्यावर



कठोर कारवाई करण्याची मागणी मी स्वतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती, असे त्यांनी स्पष्ट केले. आपण महिला असल्यामुळेच आपल्याला लक्ष्य करून बदनाम केले जात असल्याची खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. आता सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा केल्यानंतर चाकणकर यांनी पक्षीय पदाचाही त्याग केला आहे. त्यांच्या या राजीनाम्यावर पक्ष नेतृत्व सुनेत्रा पवार काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मला रोरो बोटीनं कोकण दाखवा..




कोकणात नौकेतून प्रवास करायचा झाल्यास, असे विलोभनीय दृश्य दिसल्यावाचून कसे राहील? कविवर्य ग. दि. माडगूळकरांच्या लेखणीतून उतरलेल्या या वर्णनात आता ङ्गमला रोरो बोटीनं कोकण दाखवाफ या ओळीची भर पडेल. होळीपुनवेच्या सणाला विजयदुर्ग बंदरावर मुंबईहून निघालेली रोरो बोट मोटारी आणि प्रवाशांसह धक्क्याला लागली. कोकणी चालीरीतींनुसार गाऱ्हाणे घालून तिचे स्वागतही झाले. त्यानंतर ङ्गएका कुटुंबाक १८ हजार मोजुक व्हया, त्यात कसा जमायचा,फ अशा स्वाभाविक संतप्त प्रतिक्रियाही उमटल्या. कोकणातील रोरोप्रमाणेच आता वॉटर मेट्रोच्या घोषणाही होताहेत. मात्र, हे सर्वसामान्यांच्या आवाक्यात येण्यासाठी व्यवहार्यतेचे गणित सोपे करायला हवे. सार्वजनिक प्रवासातील कोणत्याही साधनाचे व्यावहारिक यश हे दुतर्फा लोड फॅक्टरवर म्हणजेच जाताना व परतीच्या प्रवासातील प्रवासीसंख्येवर अवलंबून असते. कोकणात रेल्वे स्टेशनावर सोडायला येणारा रिक्षावाला आपल्याकडून हाफ रिटर्न भाडे मागतो, तसेच. हेच सूत्र विमानसेवा आणि जलप्रवासालाही लागू होते. विमानांना धावपट्टी आवश्यक असते; तसाच जलप्रवासाला सुस्थिर व बारमाही धक्का गरजेचा असतो. भौगोलिक परिस्थितीनुसार सुयोग्य बोटीची निवड अत्यंत महत्त्वाची असते. प्रवासाचा कालावधी, बारमाही व वक्तशीर उपलब्धता म्हणजेच निश्चितता आणि तिकिटदर हे प्रवाशांसाठी महत्त्वाचे निकष असतात. प्रवासातील रोमहर्षक अनुभव, चैन हा जर मापदंड असेल, तर तिकिटदरांच्या बाबतीत प्रवासी हात सैल सोडतात. कोकणची बोटसेवाही या सर्वच निकषांमधून तावूनसुलाखून निघत आहे. यापूर्वी दमानिया शिपिंगची गोवा बोट काही काळाने बंद झाली होती. कोणतीही सार्वजनिक वाहतूक सेवा अव्याहत व व्यवहार्यतेने सुरू ठेवायची, तर सरकारकडून पायाभूत सुविधांचे पाठबळ पुरवावे लागते. त्यासाठी नियमनाची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाचा अनेक वर्षे सुस्त कारभार होता. अजूनही त्यांचे पुरेसे अस्तित्व दिसत नाहीच. रोरो व पर्यटककेंद्री सेवांसाठी महाराष्ट्र सरकारने सध्या काही सकारात्मक पावले उचलल्याचे जरूर दिसत आहे. मात्र, अजूनही सरसकट जलप्रवास किफायतशीर झालेला नाही.

मुंबई ते विजयदुर्ग प्रवासासाठी जलमार्गे अवघ्या चार प्रवाशांना मोटारीसह किमान १८ हजार रुपये होतात. हे भाडे भरमसाठ आहे. मोटारीने जाणाऱ्या कुटुंबाला चार-पाच तासांची बचत करण्याच्या बदल्यात इतके भाडे खचितच परवडणारे नाही. त्यामुळे सर्वसामान्य कोकणवासी प्रवासी वाहतूक म्हणून हे साधन स्वीकारण्याची शक्यता कमीच. या सेवेचे योग्य बस्तान बसले, तर या मार्गानेही प्रवास करणारी एक नवी श्रेणी उदयास येऊ शकते. रेल्वेमध्ये वंदे भारत, विमानात बिझनेस क्लास असतात तसेच. तणावपूर्ण ड्रायव्हिंगला सुट्टी देणे, हाही एक उद्देश असू शकतो. मुंबई-मांडवा या मार्गावर रोरो पॅक्स म्हणजे मोटारी आणि प्रवासी दोघांना नेणारी बोट खोल समुद्रातही लांब अंतरावर प्रवास करू शकते, हे सिद्ध झाल्यावर त्याचाच कित्ता कोकणातही गिरवण्याची योजना आकारास आलेली दिसते. यापूर्वीपासूनच दाभोळ, बाणकोट, जयगड येथे कोकणातील खाड्यांमधून कमी खोलीच्या तराफ्यासारख्या बोटींमधून मोटारी, दुचाक्या नेल्या जातात. गोव्यामध्ये हे अनेक वर्षे सुरू होते. पूल बांधले गेल्यावर जलमार्ग थोडे कमी झाले. रायगड, रत्नागिरी अशा ठिकाणी खाडीतील पाणी शांत असते व हे अंतर जेमतेम दहा मिनिटांचे असते. हरिहरेश्वरच्या बांगमांडला येथून बाणकोटच्या खाडीतून बार्ज-बोटीने दहा मिनिटांत थेट रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात आपण पोहोचतो. रस्तेमार्गे खूपच वळसा पडतो. येथील बार्जला इंधनही तुलनेने कमी लागते व भरती-ओहोटीचा प्रश्न नसल्याने तो बाराही महिने वेळापत्रकानुसार चालविता येतो. भर समुद्रातील बंदरांच्या बाबतीत मात्र तसे होत नाही. मांडव्याचेच उदाहरण घ्यायचे, तर पूर्वी तिथे एप्रिलनंतर लाँच, कॅटमरानही सावधपणे धक्क्याला लावाव्या लागत. पावसाळ्याचे तीन-चार महिने तर ही वाहतूक बंदच होते. मांडव्याला रोरोसाठी समुद्रात पश्चिमेच्या दिशेने लाटारोधक बंधारा घालण्यात आला, तेव्हा कुठे रोरोचा मार्ग मोकळा झाला. मांडव्याची रोरो ही जलवाहतुकीतील गेमचेंजर ठरली, यात शंका नाही. ही रोरो सुरू करणारे एमटुएम फेरीजचे संस्थापक-संचालक अशीम मोंगिया यांनी २०१४मध्ये मांडवा जेट्टीच्या परिचालनाची जबाबदारी घेतली. मांडवा रोरोच्या यशाविषयी ते म्हणाले, ङ्गयुरोपात जर प्रत्येक देशात बोटीने प्रवास शक्य होतो, तर आपल्याकडेही व्हायला हवा, या विचाराने मला घेरले. मांडवा येथे सरकारने रोरोची योजना जाहीर केल्यावर आम्ही जगभरातून उत्तम बोटीचा शोध सुरू केला. सहा महिने शोध घेतल्यावर ग्रीसमध्ये सुयोग्य अशी रोरो बोट सापडली व १४ फेब्रुवारी २०२० रोजी मुंबई-मांडवा सेवा घोषित केली. करोनामुळे महिनाभरातच ती बंद करावी लागली. नंतर निसर्ग वादळाचाही तडाखा बसला. मात्र, तत्कालीन मुख्यमंत्र्यांचा आपत्ती पाहणी दौरा या बोटीतून पार पडला. पुढे गणपतीत ही सेवा सुरू झाली. काहीही झाले, तरी घोषित केलेली बोटफेरी रद्द करायची नाही, असा आम्ही निर्धार केला व कमी प्रवासीसंख्येत किंवा मान्सूनमध्येही ही सेवा आम्ही सुरू ठेवली




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## महिला आयोगाच्या सर्व १९ शिफारशी कागदावर

# चाकणकर यांचा कार्यकाळ फक्त प्रसिद्धीचा, फसवे दावे अन घोषणा

**मुंबई/वृत्तसंस्था :** भोंदू अशोक खरात लैंगीक प्रकरणी नुकताच राजीनामा दिलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी चार वर्षातील अध्यक्षपदाच्या कार्यकाळात राज्य सरकारला महिलांसाठीच्या तब्बल १९ शिफारशी केल्या होत्या. मात्र सूचनावजा असलेल्या या शिफारशींमागे अभ्यास, संशोधन, आकडेवारी याचा कोणताही ठोस असा आधार नसल्याने त्या सर्व शिफारशी कागदावरच राहिल्या आहेत.



चाकणकर यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली होती. आयोगाकडे वर्षाला १० हजार महिलांच्या तक्रारी येतात आणि प्रलंबित ५ हजार तक्रारी असतात. तक्रारीवर त्वरित निर्णय घेण्याचे चाकणकर यांचे आदेश होते. समुपदेशनाचा तक्रारी सोडवण्यात महत्वाचा वाटा असतो. पण चाकणकर यांचे संबंधित पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदवण्याचे व तपास जलद करण्याचे पत्र पाठवण्याला चार वर्षे प्राधान्य राहिले.

त्यामुळे तक्रारी निकाली काढल्याचे प्रमाण जरी अधिक असले तरी आयोगाच्या कार्यपद्धतीचा पिडीत महिलांना फटका बसला. ऊस तोड महिलांसाठी जिल्हा समिती स्थापना करा, गावात बालविवाह झाल्यास सरपंच व ग्रामसेवकांना निलंबीत करा, महिलांशी संबंधीत सायबर गुन्ह्यात पोलीसांनी स्वाधिकारे तक्रारी नोंदवाव्यात, तालुकास्तरावर भरोसा सेल स्थापन करावेत, महिला दिनी महिलांच्या ग्रामसभांचे आयोजन करावे, जिल्हावार विवाह समुपदेशन केंद्र असावे आदी चाकणकर यांनी सरकारला १९ शिफारशी केल्या. मात्र त्यातील कामाच्या ठीकाणी होणाऱ्या लैंगीक छळप्रतिबंधक समित्यांचा आढावा घेण्याबाबत एक शिफारस राज्य सरकारने स्वीकारल्याचे दिसते. चाकणकर यांच्या पूर्वी आयोगाने सरकारकडे अनेक शिफारशी केलेल्या आहेत. पंतप्रधान उज्वला योजनेचा महाराष्ट्रातील अभ्यास, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नींचा अभ्यास, 'सक्षमा' (ॲसिड हल्ल्यातील पीडितांना मदत), 'प्रज्वला' (स्वयं-सहायता गटांना केंद्र सरकारच्या योजनांशी जोडणे), कारागृहातील महिला कैद्यांना मिळणाऱ्या सोई असे प्रकल्प राबवले आणि त्यावर शासनाने सुसंगत असे चांगले निर्णय घेतले. चाकणकर यांच्या दोन टर्मच्या कार्यकाळात असे यश महिला आयोगाला मिळाले नाही.

आयोगाला वार्षिक ६ कोटी निधी प्राप्त होत होता. पैकी ३ कोटी वेतनावर आणि ३ कोटी वेतनेतर खर्ची पडत होते. प्रत्यक्षात मात्र जनसुनावण्या, चर्चासत्रे, दौरे यापेक्षा आयोकडून काही ठोस असे काम झाले नाही. मागच्या चार वर्षात राज्य महिला आयोग केवळ समाजमाध्यावर सक्रीय होता.

### महिला सन्मान पोर्टल बंद

..नुकत्याच झालेल्या महिला दिनी आयोगाच्या वतीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी महिला सन्मान पोर्टल कार्यन्वीत झाल्याचे जाहीर केले. सर्व पोलीस स्टेशनशी पोर्टल जोडले असून महिलांना घरातून तक्रार नोंदवता येईल, असे स्पष्ट केले. प्रत्यक्षात आयोगाचे असे कोणते पोर्टल अद्याप कार्यरत झालेले नाही.

## रुपाली चाकणकरांचा महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा

**नाशिक/वृत्तसंस्था :** भोंदूबाबा अशोक खरातला बलात्काराच्या आरोपाखाली अटक झाली असून एसआयटी पुढील चौकशी करत आहे. मात्र, याच अशोक खरातची पाद्यपूजा करताना रुपाली चाकणकर यांचे काही फोटो समोर आले होते. त्यामुळे विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. त्यानंतर रुपाली चाकणकरांनी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आता राष्ट्रवादी (अजित पवार) महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचाही रुपाली चाकणकर यांनी राजीनामा दिला आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनाम्यानंतर रुपाली चाकणकर यांना राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा द्यावा लागल्यामुळे त्यांना अशोक खरात प्रकरण चांगलंच भोवलं असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, या राजीनाम्याबाबत रुपाली चाकणकर यांनी पोस्ट करत माहिती दिली आहे. त्याच्या आर्थिक व्यवहारात, त्याच्या गैरकृत्यात दुरान्वये संबंध नाही, आजही तीच स्पष्ट व ठाम भूमिका आहे. तपासादरम्यान या सर्व बाबी निष्पन्न होतीलच. खोटे, असत्य व कुठलाही पुरावा नसताना जे आरोप माध्यमांमधून होत आहेत, ते वेदनादायक आहे. सत्य प्रखरतेने सिद्ध होईलच. हा तपास पारदर्शकपणे व निष्पक्षपणे व्हावा, ही माझी मागणी मी यापूर्वीच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पोलीस महासंचालक यांच्याकडे केली आहे.

## आक्षेपार्ह्य व्हिडीओ पसरवणारे रडारवर

**नाशिक/वृत्तसंस्था :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. दुसरीकडे, त्याच्या अत्याचाराच्या चित्रफिती समाज माध्यमात टाकणाऱ्यांवरही विशेष तपास पथकाची करडी नजर आहे. याबाबत पोलीस तसेच विशेष पथकांनी इशारा दिल्यानंतरही आक्षेपार्ह चित्रफिती समाज माध्यमात टाकणाऱ्यांची संख्या दिवसागणिक वाढत असतांना आत्ता पर्यंत कोपरगाव येथील दोन, बीड येथील एक आणि सातपुर येथे सहा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती विशेष तपासी पथकाने दिली आहे.

खरातविरूध्द सरकारवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करणाऱ्या पीडित महिलांच्या चित्रफिती काही जणांनी समाज माध्यमात टाकल्या आहेत. विशेष पथक तसेच नाशिक पोलिसांनी पीडित युवती, महिला यांची ओळख समाज माध्यमांतून किंवा अन्य माध्यमातून होईल, अशी चित्रफित टाकण्याची कृती करू नये, अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

असे असतानाही आक्षेपार्ह चित्रफिती समाज माध्यमातून वारंवार दाखविण्यात येत असल्याने समाज माध्यमावर सायबर विभाग लक्ष ठेवून आहे. त्यामुळे कोणाकडेही पीडितेची किंवा तिच्या नातेवाईकांची, तिच्या घराची, कुटूंबियांची ओळख उघड होईल अशा चित्रफिती, खोडसाळपणा केलेल्या चित्रफिती, छायाचित्र असल्यास ते तत्काळ काढून टाकावे, माध्यमात ते टाकू नये, नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर तसेच त्या समूहाच्या ॲडमिनवर कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.दरम्यान, अहिल्या नगर जिल्ह्यातील कोपरगाव परिसरातील बीएमडब्ल्यू या व्हॉट्स अप ग्रुप वर तीन जणांनी या चित्रफिती प्रसारित केल्या. या तीघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच सिडको आणि सातपुर वॉलमन या व्हॉट्स अपग्रुपवर ॲडमिन रमीज शेख, राहुल पवार,प्रवीण काटे, राहुल हिवा , साहिल सय्यद तसेच अन्य सदस्य यांनी आक्षेपार्ह्य चित्रफिती प्रसारित केल्या.

## २०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे होणार नियमानुकूल; महसूलमंत्री बावनकुळे यांची माहिती

**मुंबई/वृत्तसंस्था :** मुंबई वगळून राज्यातील इतर भागात सन 2011 पर्यंत झालेली व सध्या केवळ निवासासाठी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, महसूल विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) जारी केला असल्याची माहिती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.



महसूल विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, 500 चौरस फुटांपर्यंतचे निवासी अतिक्रमण पूर्णपणे विनामूल्य नियमानुकूल करण्यात येणार आहे. तर, उर्वरित क्षेत्रासाठी प्रचलित बाजारमूल्याच्या केवळ 10 टक्के रक्कम कब्जेहक्काची रक्कम म्हणून आकारली जाईल.

मात्र, नदीपात्र, नाले, गायरान, सार्वजनिक रस्ते, वने, स्मशानभूमी, खेळण्याची मैदाने किंवा शाळा- रुग्णालयांसाठी आरक्षित असलेल्या जमिनींवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमित केली जाणार नाहीत. अशा बाधित कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजनेतून पर्यायी घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. तसेच, कोणत्याही परिस्थितीत भारताचा नागरिक नसलेल्या व्यक्तीचे अतिक्रमण नियमित होणार नाही. याची दक्षता अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने घ्यायची आहे. असे अतिक्रमण आढळल्यास पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविण्याचे आदेश देण्यात आल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. यामुळे वेगवेगळ्या शासन मान्यतांची गरज पडणार नाही. या समित्याच निर्णय घेतील. जिल्हास्तरावर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली 17 सदस्यांची समिती असून, विधानसभा क्षेत्रनिहाय आमदारांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापण्यात येणार असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.

# झिरवाळ यांच्या अश्लील चित्रफितीची तपासणी होणार : फडणवीस

**मुंबई/वृत्तसंस्था :** अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या समाज माध्यमावर प्रसारीत झालेल्या अश्लील चित्रफितीची राज्य सरकार सत्यता पडताळणार आहे. चित्रफितीची शहानिशा झाल्यानंतर याप्रकरणी कारवाईबाबत निर्णय घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी जाहीर केले. दुसरीकडे, राष्ट्रवादी अजित पवार गटाने झिरवाळ यांना अभय दिले असले तरी शिवसेना शिंदे गटाने मात्र झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.



दोन दिवसांपूर्वी झिरवाळ यांची चित्रफित समाज माध्यमांवर प्रसारित झाली होती. त्यानंतर झिरवाळ यांच्या मंत्रीपदाच्या राजीनाम्याची विरोधकांनी मागणी केली होती. या वादानंतर माध्यमांपासून दूर राहिलेल्या झिरवाळ यांनी मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरून चर्चा करीत त्यांची बाजू मांडली.

झिरवाळ यांच्या अश्लील चित्रफीतीच्या संदर्भात विचारण्यात आले असता मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मला झिरवाळ यांनी दूरध्वनी केला होता. सदर चित्रफीत अनेक तुकडे जोडून बनवलेली आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. यासंदर्भात पोलीसांत तक्रार द्या, असा सल्ला मी त्यांना दिला आहे. जी घटना समोर आली आहे ती गंभीर आहे. त्याची सत्यता तपासली जाईल. त्यानंतर त्यांच्या पक्षाच्या नेत्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि मी याप्रकरणी योग्य तो निर्णय घेऊ, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. आश्चर्य म्हणजे याप्रकरणी झिरवाळ यांनी अद्याप कोणताही खुलासा केलेला नाही. दोन महिन्यापूर्वी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील कार्यालयात ३५ हजाराची लाच स्वीकारताना लिपीकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले होते. त्यांच्या खाजगी सचिवाची चौकशी सुरु आहे. त्यानंतर अश्लील चित्रफीत समोर आली. या चित्रफीतीमध्ये तृतीयपंथी व्यक्ती झिरवाळ यांच्या शयनकक्षात दिसते आहे. या प्रकरणावर अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसने अद्याप कोणतीही भूमिका व्यक्त केलेली नाही. याप्रकरणी झिरवाळ यांच्यावर पक्षाकडून कारवाई करण्याची शक्यता नाही, असे राष्ट्रवादीतील सुत्रांनी सांगितले. शिंदे शिवसेनेच्या प्रवक्त्या शायना एन. सी. यांनी आज पत्रकार परिषदेत मंत्री झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली. झिरवाळ यांनी नैतिकतेच्या मुद्यावर मंत्रीपदाचा राजीनामा द्यायला हवा, असे शायना यांनी म्हटले आहे.

# 28 वर्षीय बॉडीबिल्डरचा स्वत:वरच वार, जी झिरो फॅट बॉडी मिरवली, तीच ठरली जीवघेणी

**लखनौ :** मोठ्या भावासोबत फोनवर झालेल्या वादातून २८ वर्षीय शरीरसौष्ठवपटूने स्वतःवरच वार केले. जांघेत चाकू खुपसल्यामुळे रक्तस्राव होऊन सलमानचा मृत्यू झाला. पश्चिम उत्तर प्रदेशमधील मेरठ जिल्ह्यात ही घटना घडल्याचं समोर आलं आहे. सलमानच्या झिरो फॅट बॉडी आणि सुडौल शरीराचे अनेक चाहते होते, दुर्दैवाने हीच देहयष्टी त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरली.उत्तर प्रदेशमधील मेरठ जिल्ह्यात इंचौली येथे राहणाऱ्या २८ वर्षीय सलमानचा पोल्ट्री फार्म होता. तो या भागातील प्रसिद्ध बॉडी बिल्डरही होता. गुरुवारी सकाळी सलमान आपल्या खोलीत होता. यावेळी फोनवर मोठा भाऊ इम्रानसोबत त्याचं काही कारणावरुन कडाक्याचं भांडण झालं. वाद इतका विकोपाला गेला, की सलमानच्या मनात राग धुमसू लागला. त्याने फोन ठेवताच घरातील भाजी चिरण्याचा चाकू घेतला आणि



जांघेत वार केलाडॉक्टर आणि तज्ज्ञांच्या मते, सलमानच्या मृत्यूचं कारण म्हणजे त्याचं सुडौल शरीर आणि झालेला अतिरक्तस्राव. एका सामान्य व्यक्तीच्या शरीरावर चरबीचा एक थर असतो, जो कोणत्याही बाह्य आघातापासून 'गादी'प्रमाणे किंवा संरक्षक कवचासारखे काम करतो.बऱ्याच काळापासून सलमान जिममध्ये प्रचंड घाम गाळून आपले वजन कमी करत होता आणि आपले 'ॲब्स' घडवण्यावर त्याने लक्ष केंद्रित केलं होतं. शरीरातील चरबीचा अभाव आणि स्नायूंचा कमालीची कडकपणा, यामुळे चाकू थेट तीन इंच खोलवर घुसला. त्यामुळे सलमानयाच्या मांडीतील मुख्य रक्तवाहिनी (फिमोरल आर्टरी) कापली गेली.ज्या क्षणी 'फेमोरल व्हेन' (मांडीतील मुख्य शीर) कापली गेली, त्या क्षणी रक्ताचा फवाराच उडाला. त्याच्या कुटुंबीयांनी त्याला तातडीने रुग्णालयात दाखल केलं, परंतु शरीरातील चरबीच्या संरक्षक थराचा अभाव असल्यामुळे, ती जखम इतकी खोलवर गेली होती की डॉक्टरांनाही रक्तस्राव थांबवणे शक्य झाले नाही.वैद्यकीय शास्त्रानुसार लठ्ठ व्यक्तींमध्ये 'सबक्युटेनियस फॅट'— म्हणजेच त्वचेच्या अगदी खाली असलेला चरबीचा थर हा एक संरक्षक अडथळा म्हणून कार्य करते; ज्यामुळे धारदार शस्त्रांना शरीरात इतक्या खोलवर शिरकाव करता येत नाही की ती थेट अंतर्गत अवयवांपर्यंत पोहोचतील.

याउलट, जे लोक नियमितपणे जिममध्ये जातात, त्यांचे स्नायू अत्यंत पीळदार आणि सुडौल असतात; यामुळे चाकू किंवा इतर कोणतेही धारदार शस्त्र शरीरात विनाअडथळा खोलवर शिरकाव करु शकतं आणि थेट रक्तवाहिन्या किंवा हाडांपर्यंत पोहोचू शकतं. सलमानच्या मृत्यूमुळे त्याचं कुटुंब पूर्णपणे हादरुन गेलं आहे.

त्याच्या लग्नाला चार वर्षे झाली होती. त्याला दोन लहान मुलं आहेत. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली, मात्र कुटुंबातील सदस्यांनी कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यास किंवा शवविच्छेदन करण्यास स्पष्टपणे नकार दिला. एएसपी बजरंग प्रसाद यांनी सांगितले की, हे प्रकरण आत्महत्येचे असल्याचे दिसून येत आहे आणि कुटुंबाने या संदर्भात कोणतीही तक्रार दाखल केलेली नाही.

## घरगुती वादाच्या भांडणात राडा झाला, जबर मारहाणीत तिघे गंभीर जखमी

**पुणे :** पुण्यातील मार्केट यार्ड परिसरात घरगुती वादाने धोकादायक वळण घेतलं आणि थेट हिंसाचारात रूपांतर झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नवरा-बायकोमधील किरकोळ भांडण चिघळत गेलं आणि बाहेरच्यांनी हस्तक्षेप करत धारदार शस्त्राने हल्ला चढवला. या घटनेत एकाच कुटुंबातील तिघे गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. घटनेनंतर परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे.२५ मार्च रोजी हा सगळा प्रकार घडला. सुरुवात साध्या घरगुती वादातून झाली. नवरा-बायकोमध्ये काही कारणावरून वाद झाला आणि तो हळूहळू वाढत गेला. बघता बघता हा वाद इतका चिघळला की बाहेरच्याही लोकांनी यात उडी घेतली.तक्रारदार रोहितसिंग भोंड यांनी मार्केट यार्ड पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, काही जणांनी एकत्र येत शिवीगाळ करत थेट धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात रोहितसिंग भोंड, त्यांचे वडील सुरजीतसिंग भोंड आणि भाऊ रोनकसिंग भोंड हे तिघे गंभीर जखमी झाले. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. लोकांनी लगेच जखमींना रुग्णालयात दाखल




केलं. सध्या त्यांच्यावर पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत आणि त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचं सांगितलं जातंय.

या प्रकरणात पोलिसांनी सागरसिंग जुनी, पिल्लूसिंग जुनी, कृष्णासिंग जुनी, अवतारसिंग जुनी, कन्हैयासिंग जुनी, ओमकारसिंग जुनी आणि शंकरसिंग जुनी या आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे. सर्व आरोपींविरोधात कायदेशीर कारवाई सुरू आहे. या घटनेनंतर परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी खबरदारी घेतली असून पुढील तपास सुरू आहे.एकंदरीत काय, छोटासा घरगुती वाद कधी एवढा मोठा होईल आणि जीवावर बेतू शकतो, याचं हे ताजं उदाहरण आहे. त्यामुळे अशा वादांना वेळेवर आवर घालणं किती गरजेचं आहे, हे पुन्हा एकदा समोर आलंय.

## डोंबिवलीकर शिक्षिकेला आक्षेपार्ह व्हिडिओ पाठवले

**डोंबिवली :** डोंबिवलीतील एका नामांकित शाळेतील शिक्षिकेला ट्रस्टीच्या मुलाने आक्षेपार्ह व्हिडीओ वारंवार पाठवून तिचा विनयभंग केल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत या शिक्षिकेने शाळा प्रशासनाकडे तक्रार केली होती. मात्र त्यांनी शिक्षिकेलाच दोषी ठरवल्याने अखेर मनसेची मदत घेतली. यानंतर मानपाडा पोलिसांनी सरवन अय्यर याच्या विरोधात गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे.सागाव भागातील एका शाळेच्या शिक्षिकेला संगणक शिक्षक असलेल्या अय्यर याने शाळेच्या मोबाइल क्रमांकावरून मेसेज केले. शाळेतील लिपिक मेसेज करत असतील, असे समजून या शिक्षिकेने मेसेजला प्रत्युत्तर दिले. त्यानंतर सरवन याने आपल्या वैयक्तिक नंबरवरून या शिक्षिकेकडे वेगवेगळ्या मागण्या केल्या. मात्र तिने त्याला नेहमी समजावत नकार दिला. त्यानंतर त्याने अश्लील व्हिडीओ पाठवले. हा त्रास सहन न झाल्याने या शिक्षिकेने मुख्याध्यापकाकडे तक्रार केली. त्यावेळी मुख्याध्यापकाने एआयच्या मदतीने व्हिडीओ तयार करत ट्रस्टीच्या मुलाला बदनाम करत असल्याचे सांगत फटकारले.

## दागिन्यांसाठी महिलेला संपवलं


**छत्रपती संभाजीनगर :** दौलताबाद परिसरातील आसेगाव शिवारात अंदाजे 60 वर्षीय महिलेचा संशयास्पद मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. प्राथमिक पाहणीत या वृद्धेची हत्या झाल्याचा दाट संशय व्यक्त केला जात असून, तिच्या कानातील दागिने ओरबाडून घेतल्याच्या खुणा दिसून येत आहेत. मृतदेहाची ओळख पटवण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान असून, त्यासाठी आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, धुळे-सोलापूर महामार्गालगत असलेल्या आसेगावच्या शिवारात गुरुवारी सकाळी एका शेतकऱ्याला ओढ्याकाठी एक महिला मृतावस्थेत दिसली. या घटनेची माहिती मिळताच दौलताबाद पोलीस ठाण्याच्या निरीक्षक रेखा लोंढे आणि त्यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाची अवस्था पाहता ही केवळ दुर्घटना नसून घातपात असण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवण्यात आली आहे.मृत वृद्धेचा एक कान फाटलेला आढळला असून, त्यावरून तिच्या कानातील सोन्याचे दागिने जबरदस्तीने खेचल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच, सदर महिलेचे तोंड दाबून तिचा श्वास रोखण्याचा प्रयत्न केल्याचेही प्राथमिक तपासात समोर



आले आहे. गुन्हे शाखेच्या पथकासह फॉरेन्सिक टीम आणि श्वानपथकालाही तपासासाठी पाचारण करण्यात आले असून, ठोस पुराव्यांचा शोध सुरू आहे.दरम्यान, मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी सायबर विभागाला महत्त्वाचे निर्देश दिले. त्यानुसार, सायबर ठाण्याचे निरीक्षक सोमनाथ जाधव यांच्या पथकाने एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने मृत महिलेचे स्पष्ट छायाचित्र तयार केले आहे. हे छायाचित्र आता राज्यभरातील पोलीस ठाण्यांमध्ये पाठवण्यात आले असून, नागरिकांनाही मदतीचे आवाहन करण्यात आले आहे.

## भररस्त्यात बायकोचा जीव घेतला; बारामतीकर तरुणाला अटक

**बारामती :** कर्नाटकमधील कलबुर्गी जिल्ह्यात पत्नीची अमानुष पद्धतीने हत्या केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला असून या घटनेनं संपूर्ण राज्यात संताप व्यक्त केला जात आहे. बारामती येथील अक्षय आणि शैला हे दाम्पत्य देवदर्शनासाठी गाणगापूरला गेले असताना हा भीषण प्रकार घडला. मिळालेल्या माहितीनुसार, रस्त्यातील किरकोळ वादातून संतापलेल्या अक्षयने पत्नी शैलाला कारमधून ओढून बाहेर काढत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ स्थानिकांनी मोबाईलमध्ये कैद केला असून तो सध्या सोशल मीडियावर प्रचंड प्रमाणात व्हायरल होत आहे.अक्षयने धारदार शस्त्राने



शैलाचागळा चिरला. तो इतक्यावरच न थांबता रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पत्नीवरून कार चालवत तिला चिरडलं, ज्यात तिचा जागीच मृत्यू झाला. या अमानुष कृत्यामुळे परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. दरम्यान, पोलिसांनी आरोपी अक्षयला अटक केली असून, ही हत्या पूर्वनियोजित असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. देवदर्शनाच्या बहाण्याने पत्नीला कर्नाटकात आणून हा कट रचल्याची शक्यता पोलीस तपासात आहेत.हा संतापजनक प्रकार पाहून स्थानिक नागरिक मदतीसाठी धावले. नागरिकांनी मध्यस्थी करून परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला. हा संपूर्ण प्रकार काही स्थानिकांनी आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात देखील कैद केला आहे. नागरिक तिथे असेपर्यंत आरोपी मी काहीच करत नसल्याचं भासवत होता. मात्र, नागरिक बाजूला होताच त्याने क्रूरतेचा कळस गाठला.मारहाणीमुळे रस्त्याच्या कडेला पडलेल्यापत्नीवर आरोपी पतीने थेट कार चढवली. अत्यंत अमानुषपणे कार खाली चिरडल्यामुळे गंभीर दुखापत होऊन या २८ वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला. पत्नीच्या चारित्र्यावर संशय असल्यानं पतीने हे कृत्य केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.
पुण्यातल्या कात्रज भागात एक अंगावर काटा आणणारी घटना समोर आली आहे. सोशल मीडियावर जुळलेलं प्रेम, त्यातून झालेला विवाह, पण त्यानंतर सुरू झालेला छळ अखेर एका २० वर्षीय तरुणाच्या जीवावर बेतला. पत्नी आणि तिच्या माहेरच्यांच्या कथित त्रासाला कंटाळून तरुणाने उंदीर मारायचं औषध पिऊन मृत्यूला कवटाळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मोहम्मद साद (साद) आसीफ सय्यद असं मृत तरुणाचं नाव आहे.

# पाच ट्रॉफी जिंकणाऱ्या मुंबई इंडियन्सकडे विजेतपदाचा सलग 5 वर्ष दुष्काळ, यंदाही टीमची पडती बाजू कायम



**मुंबई/वृत्तसंस्था :** एके काळी आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेवर दबदबा राखणारा मुंबई इंडियन्स संघ २०२० पासून करंडक उंचावू शकलेला नाही. या वेळीही कागदावर हा संघ मजबूतच आहे. त्यामुळे जेतेपदाचा दुष्काळ संपणार का, याबाबत उत्सुकता आहे. भारतीय संघाने टी-२० वर्ल्ड कप जिंकला. या वर्ल्ड कप विजेत्या संघातील हार्दिक पंड्या, सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह, तिलक वर्मा हे मुंबई इंडियन्सचे सदस्य, त्यामुळे संघाचा आत्मविश्वास उंचावलेला. मार्गदर्शनासाठी रोहित शर्मासारखा अनुभवी खेळाडूही आहे. पण टीममध्ये सर्वोत्तम स्पिनर एकच आहे.जसप्रीत बुमराहच्या १८३ विकट त्याने या टी-२० सामन्यांत ही कामगिरी केली आहे. मुंबई संघातील खेळाडूंचे सरासरी वय ३०हून अधिक आहे. अनुभवी खेळाडू अधिक असले, तरी त्यांच्यातंदुरुस्तीचा प्रश्न भेडसावू शकतो. मॅच विनर्स खेळाडू, एक हाती लढत जिंकून देऊ शकतील असे पंड्या, सूर्या, तिलक, रोहित, डीकॉक, बुमराह संघात आहेत. रोहित-डीकॉक ही जोडी सलामी येऊ शकते. सूर्या तिसऱ्या, तर तिलक चौथ्या आणि हार्दिक पाचव्या क्रमांकावर येऊ शकतो. नमन धीरही संघात आहे. रायन रिकेल्टनचा पर्यायही संघाकडे आहे.रोहित शर्मानं आयपीएलच्या एक मोसमात ४०० हून अधिक धावा करण्याची कामगिरी नऊ वेळा केली आहे. या कामगिरीत तो विराट कोहली (११वेळा) खालोखाल दुसऱ्या क्रमांकावर. गेल्या मोसमात सूर्यकुमार ७१७ धावा केल्या होत्या. मुंबईकडून एका मोसमात सर्वाधिक धावा करण्याचा सूर्याचा हा विक्रम आहे. त्याने सचिन तेंडुलकरचा (६१८ धावा, २०१०) विक्रम मोडला होता. डिसेंबरमध्ये झालेल्या मिनी लिलावात मुंबई इंडियन्सकडे केवळ २.७५ कोटी रुपये होते. कारण, त्यांनी भारतीय संघातील सर्वच खेळाडूंना संघात कायम राखले.

त्यांनी क्विंटन डीकॉकची एक कोटी रुपयांत खरेदी केली. मुंबई संघाकडे बुमराहसारखा हुकमी एक्का आणि ट्रेंट बोल्टसारखा अनुभव गोलंदाज असला, तरी सर्वोत्तम फिरकी गोलंदाजीची संघाला उणीव भासू शकते. मिचेल सँटनर हा एकमेव अनुभवी फिरकी गोलंदाज संघात आहे.

## संघर्षाचा परिणाम क्रिकेटविश्वावर; चेंडूंचा तुटवड्यामुळे मॅच होणार की नाही?

**मुंबई/वृत्तसंस्था :** इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील युद्ध थांबण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. या संघर्षात हजारो लोकांनी आपले प्राण गमावले आहेत आणि पश्चिम आशियाभर विध्वंस पसरला आहे. मोठी तेल आणि वायू जहाजे समुद्रात अडकली आहेत, तर हजारो लोक विविध विमानतळांवर अडकून पडले आहेत. याचा परिणाम जगाच्या इतर भागांमध्येही हळूहळू जाणवत आहे. क्रीडा जगही याला अपवाद नाही, आता या युद्धमुळे चेंडूंच्या तुटवडा भासत आहे.




ब्रिटिश वृत्तपत्र डेली मेलमधील एका वृत्तानुसार, 3 एप्रिलपासून सुरू होणाऱ्या देशांतर्गत County Championship नवीन हंगामापूर्वी इंग्लंड क्रिकेट बोर्ड चेंडूंच्या तुटवड्याचा सामना करत आहे. 18 संघांचा समावेश असलेल्या काउंटी चॅम्पियनशिपमध्ये ड्यूक्स चेंडू वापरले जातात. हे चेंडू इंग्लंडमधील ड्यूक्स कंपनीद्वारे तयार केले जातात, परंतु यात दक्षिण आशियाचीही महत्त्वपूर्ण भूमिका आहे आणि सध्या इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील युद्धामुळे समस्या निर्माण होत आहेत.माध्यमांच्या वृत्तानुसार, दरवर्षी काउंटी हंगामासाठी 4,000 ते 5,000 चेंडू वापरले जातात. हे चेंडू दक्षिण आशियातून आयात केले जातात. या चेंडूंमध्ये वापरले जाणारे चामडे आणि इतर साहित्य इंग्लंडमधून आयात केले जाते, परंतु चेंडू येथे हाताने शिवले जातात. ड्यूक्स कंपनीचे मालक दिलीप जाजोदिया यांनी वृत्तपत्राला सांगितले की, पुरेशा प्रमाणात चेंडू तयार आहेत, परंतु युद्धामुळे निर्माण झालेल्या सध्याच्या व्यत्ययांमुळे विमान कंपन्या त्यांची वाहतूक करू शकत नाहीत. त्यांनी असेही स्पष्ट केले की, चेंडू आयात करण्याचा खर्च प्रति किलोग्राम 5 पौंडवरून 15 पौंडपर्यंत वाढला आहे. त्यांनी असेही सांगितले की, ते केवळ 50% चेंडूंचा पुरवठा करू शकतात.या सर्व अटकळांच्या दरम्यान, इंग्लंड क्रिकेट बोर्डाने कोणत्याही समस्या नसल्याचे नाकारले आहे. ईसीबीने सांगितले की, त्यांनी आधीच पुरेसे चेंडू खरेदी केले असून ते सर्व काउंटी क्लबना उपलब्ध करून दिले आहेत. मंडळाने पुढे असेही सांगितले की, काउंटी चॅम्पियनशिप हंगाम आणि 4 जून रोजी इंग्लंड-न्यूझीलंड सामन्याने सुरू होणारा देशांतर्गत कसोटी हंगाम या दोन्हींवरही परिणाम होणार नाही.

## सलामीच्या लढतीत RCB-SRH आमनेसामने

**बंगळूर :** आयपीएल 2026 चा महासंग्राम आजपासून सुरू होत असून, गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी) आपल्या विजेतपदाचा बचाव करण्यासाठी मैदानात उतरणार आहे. एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर होणाऱ्या या पहिल्या सामन्यात आरसीबीचा सामना स्फोटक फलंदाजीसाठी प्रसिद्ध असलेल्या सनरायजर्स हैदराबाद (एसआरएच) संघाशी होणार आहे. या सामन्यात विराट कोहलीच्या खेळीकडे सर्वांच्या नजरा असणार आहेत. आरसीबीकडून



फिल सॉल्ट आणि विराट कोहली डावाची सुरुवात करतील, अशी अपेक्षा आहे. फिलचा अनुभव पाहता, त्याला सलामीच्या जागेसाठी एक प्रबळ दावेदार मानले जात आहे. जेकब बेथेलच्या उत्कृष्ट फॉर्मकडे दुर्लक्ष करणे कठीण आहे. देवदत्त पडिक्कल तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करू शकतो. आरसीबीला पहिले विजेतपद मिळवून देणारा रजत पाटीदार चौथ्या क्रमांकावर खेळताना दिसू शकतो. जितेश शर्मा यष्टिरक्षक असेल. टीम डेव्हिड आणि रोमारिओ शेफर्ड यांच्यासारख्या पॉवर-हिटर खेळाडूंनाही अंतिम संघात स्थान मिळू शकते. यश दयाल आणि जोश हेझलवूड यांच्या अनुपस्थितीत भुवनेश्वर कुमारची जबाबदारी वाढली आहे. यश दयालच्या अनुपस्थितीमुळे मंगेश यादवला संधी मिळू शकते.

## अरे देवा, रोहितला तर ओळखलंच नाही



**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल २०२६ ला सुरूवात होण्याआधी मुंबई इंडियन्सच्या मालकीण नीता अंबानी आणि रोहित शर्मा यांचा मैदानातील एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. ज्यामध्ये मुंबईच्या खेळाडू सराव करत असताना तिथे नीता अंबानी येतात. त्यावेळी आपला हिटमॅन म्हणजे रोहित शर्मा याला त्यांनी ओळखलंच नाही. कारण म्हणजे रोहितने त्याचा वाढवलेला फिटनेस, रोहितने आपले वजन कमी केले असून वन डे वर्ल्ड कप २०२७ साठी फिटनेसवर मेहनत घेतोय. स्वत: वर घेत असलेल्या मेहनतीचं फळ मिळताना दिसत आहे. कारण गेली अनेक वर्ष आपल्या रोहितच्या संपर्कात असलेल्या नीता अंबानी त्याला ओळखू शकल्या नाहीत. रोहित तर एखाद्या तरूण मुलासारखा दिसत असल्याचं त्या म्हणाल्या.नीता अंबानी या सराव सत्रावेळी आपल्या संघातील सर्व खेळाडूंना भेटत होत्या. जेव्हा त्या रोहित शर्माला भेटल्या तेव्हा हसल्या आणि म्हणाल्या, अरे देवा, मी तर तुला ओळखलंच नाही. तु तर एखाद्या तरूण मुलासारखा दिसत आहेस. रोहितही स्माईल करत त्यांना प्रतिसाद देतो. रोहित आणि नीता अंबानी यांचा हा व्हिडीओ मुंबई इंडियन्सने आपल्या सोशल मीडियावर हँडल्सवर शेयर केला आहे.नीता अंबानी यांचे नातवंडे त्यांच्यासोबत असल्याचं व्हिडीओमध्ये दिसत आहेत. जेव्हा किरॉन पोलार्ड याचा परिचय त्या आपला नातवंडांना करून देत होत्या त्यावेळी पोलार्डला पॉली काका असं म्हणाल्या. नीता अंबानी यांची फक्त कोच आणि प्रमुख खेळाडू नाहीतर युवा खेळाडू आणि संघात नवीन दाखल झालेल्या खेळाडूंशी संवाद साधला. त्यामुळे फक्त एक व्यावसायिक संघ न राहता एक फॅमिली म्हणून खेळाडू आपले प्रदर्शन करतील.

हार्दिक पांड्या (कर्णधार), रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, जसप्रीत बुमराह, क्विंटन डीकॉक, राज अंगद बावा, अथर्व अंकोलेकर, रॉबिन मिंझ, शेरफन रुदरफोर्ड, रायन रिक्लेटन, नमन धीर, मिचेल सैंटनर, शार्दूल ठाकूर, ट्रेंट बोल्ट, दीपक चहर, मयंक रावत, कॉर्बिन बॉश, विल जॅक्स, मयंक मार्कंडे, रघू शर्मा, महंमद अझहर, अल्ला घाझनफर, दानिश मालेवार.

## ऑलिम्पिकमधील ट्रान्सजेंडरना वगळले, स्पर्धेत नसणार प्रवेश



**मुंबई/वृत्तसंस्था :** सध्या ऑलिम्पिक स्तरावर किती पारलिंगी महिला स्पर्धा करत आहेत, हे अद्याप स्पष्ट नाही. २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुष म्हणून जन्मलेल्या नंतर महिला झालेल्या एकाही खेळाडूचा सहभाग नव्हता. मात्र, टोकियो ऑलिम्पिकमध्ये वेटलिफ्टर लॉरेल हबर्डचा सहभाग होता, तिने कोणतेही पदक जिंकले नव्हते. '२०२८च्या ऑलिम्पिकपासून लागू होणारे हे पात्रता धोरण महिला खेळाडूंमध्ये निष्पक्षता निर्माण करेल,' असे आयओसीने म्हटले आहे.सुरुवातीस पुरुष असलेल्या पण नंतर महिला झालेल्या खेळाडूंची ताकद सर्वसाधारण महिलांपेक्षा जास्त असते. पुरुष म्हणून जन्मलेल्या महिलांना यशाची संधी जास्त असते, यामुळे महिला म्हणूनच जन्मलेल्या खेळाडू नाराज होत्या. ऑलिम्पिक वगळता अन्य स्पर्धांमध्ये या पारलिंगी खेळाडू खेळू शकतात, हे आयओसीने स्पष्ट केले. ऑलिम्पिक सनदनुसार खेळ खेळण्याचा अधिकार हा मानवी हक्क आहे, असे सांगायलाही आयओसी विसरली नाही. पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी, ट्रॅक अँड फील्ड, पोहणे आणि सायकलिंग या तीन खेळांमध्ये पारलिंगी महिलांना वगळले.द. आफ्रिकेची धावपटू सेमेन्या, जिचा जन्म महिला म्हणून झाला होता, तिच्या शरीरात नैसर्गिकरित्या टेस्टोस्टेरॉनची पातळी जास्त आहे, तिने युरोपियन मानवाधिकार न्यायालयात नियमांविरुद्ध कायदेशीर लढा दिला होता.पुरुष म्हणून जन्म घेतल्याने काही शारीरिक फायदे मिळतात जे कायम राहतात असे तज्ज्ञांचे मत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये महिलांच्या खेळातून पुरुष म्हणून जन्मलेल्यांना बाहेर ठेवणे या कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली होती.या आदेशानुसार, पारलिंगी खेळाडूंना महिलांच्या खेळात सहभागी होऊ देणाऱ्या संघटनांचा निधी रोखण्याची धमकीही देण्यात आली होती. दरम्यान, कार्यकारी मंडळाच्या बैठकीनंतर, आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने १० पानांचे धोरण दस्तऐवज प्रसिद्ध केले. दोन ऑलिम्पिक सुवर्ण जिंकलेल्या कॅस्टर सेमेन्यासारख्या खेळाडूंच्या सहभागावरही निर्बंध घातले आहेत.

# इराणींना फाशी दिली, तेव्हा कुठे होता? बोमन इराणींवर भडकली अभिनेत्री; नेमकं काय घडलं?



इराणच्या तेहरानमध्ये जन्मलेली अभिनेत्री आणि मॉडेल मंदाना करीमी ही पश्चिम आशियात सुरु असलेल्या संघर्षाविषयी मोकळेपणे व्यक्त होत आहे. नुकतंच अभिनेते बोमन इराणी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याबद्दलचा एक विनोदी व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला होता. ट्रम्प यांनी इराणशी शांततापूर्ण संवाद साधण्याची इच्छा व्यक्ती केली होती. त्यावरून हा मजेशीर व्हिडीओ त्यांनी पोस्ट केला होता. या व्हिडीओवरून आता मंदानाने बोमन इराणी यांना सुनावलं आहे. पारशी असून इराणींच्या मुद्द्यावर याआधी आवाज का उठवला नाही, असा सवाल तिने केला आहे.बोमन इराणींच्या व्हिडीओवर कमेंट करत मंदाना करीमीने लिहिलं, 'बोमन इराणी महोदय.. अचानक तुम्ही इराणबद्दल इतकं काही बोलू लागला आहात. वेळसुद्धा विचित्र आहे. अनेक वर्षांपासून इराणींना अटक केली जात आहे, फाशी दिली जात आहे, त्यांना गप्प केलं जातंय, हजारो लोक मारले गेले, कुटुंबं उद्ध्वस्त झाली आणि आपल्यासारख्या लोकांनी हे दु:ख सहन केलंय. आपण याबद्दल बोललो आहोत. परंतु आता.. एक व्हिडीओ समोर आला आहे. आता गॅस, ट्रम्प आणि माझ्या घरी या.. यांसारख्या मुद्द्यांवर खिल्ली उडवली जातेय."तुम्ही आणि पारशी समुदाय हा इराणचा आहे. तुम्ही त्या इतिहासाला आपल्यासोबत घेऊन फिरता. त्या अग्निला.. मग जेव्हा इराणी मरत होते, तेव्हा हा आवाज कुठे होता? आणि आता अचानक हे सर्व गॅस, राजकारण, वैश्विक मुद्द्यांना प्रभावित करतंय, त्यामुळे बोललं जातंय. मौनापासून उपहासापर्यंत.. हे तर खूपच लवकर घडलं. असो', अशा शब्दांत तिने टोला लगावला आहे.मंदाना करीमीच्या या टिप्पणीवर बोमन इराणी यांनी काही उत्तर दिलं नाही. मात्र नेटकऱ्यांनी तिला प्रतिक्रिया दिल्या आहेत. 'डार्लिंग, हा फक्त उपहास होता', असं एकाने म्हटलंय. तर 'ही किती विचित्र गोष्ट आहे की जे लोक अनेक वर्षांपासून इराणमध्ये राहत नाहीयेत, ते अचानक सत्ता परिवर्तनाचे विशेषज्ज्ञ बनून अमेरिका-इस्रायलच्या वक्तव्यांशी सहमत होतात', असं दुसऱ्या युजरने लिहिलं आहे. काहींनी मंदानालाही ट्रोल केलं आहे.

बोमन इराणी यांनी इन्स्टाग्रामवर व्हिडीओ पोस्ट करत ट्रम्प यांची खिल्ली उडवली होती. या व्हिडीओत ते म्हणाले, "तुम्हाला माहीत असेलच की डोनाल्ड ट्रम्प यांना इराणी लोकांशी बोलायचं आहे. त्यासाठी तीन जणांना आमंत्रित करण्यात आलं आहे. स्मृती इराणी, अरुणा इराणी आणि मी.. बोमन इराणी. मी तर तयार आहे. शांततेसाठी मी काहीही करायला तयार आहे. पण जर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वॉशिंग्टनहून सोबत मोठा गॅस सिलिंडर घेऊन आले तर मी त्यांना विशेषत: एलपीजीचं संकट लक्षात घेऊन दादर परसी कॉलनीतील माझ्या घरी धनसक, कस्टर्ड आणि पारशी व्यंजनांचं भोजन खाऊ घालेन."

## रणवीर नंतर कोणासोबत साराचा रोमान्स



अभिनेत्री सारा हिच्याबद्दल सांगायचं झालं तर, अभिनेत्रीने लहानपणापासूनच अभिनय विश्वात पदार्पण केलं आहे. अखेर 'धुरंधर' सिनेमात तिने मुख्य अभिनेत्रीची भूमिका बजावली आणि चाहत्यांचं मनोरंजन केलं. आज सर्वत्र फक्त आणि फक्त सारा हिची चर्चा रंगली आहे. 'धुरंधर: द रिवेंज' सिनेमातून मुख्य अभिनेत्री म्हणून करियरची सुरुवात करणाऱ्या सारा हिने फक्त मोठ्या पडद्यावर नाही तर, चाहत्यांच्या मनावर देखील राज्य केलं आहे. 19 मार्च रोजी प्रदर्शित झालेल्या सिनेमानंतर सर्वच स्तरातून सारा हिचं कौतुक होत आहे, सांगायचं झालं तर, 'धुरंधर' सिनेमा साराच्या आयुष्यातील फार मोठा टर्निंग पॉइंट ठरला आहे.. असं म्हणालया हरकत नाही.धुरंधर सिनेमानंतर सारा हिला आणखी एक मोठ्या प्रोजेक्टसाठी संधी मिळाली आहे. ज्यामुळे सारा हिचं करियर वेगळ्या उंचीवर जाण्याची शक्यता आहे... मीडिया रिपोर्टनुसार, सारा हिला दिग्दर्शक झोया अख्तर हिच्या प्रॉडक्शन हाऊस अंतर्गत तयार होत असलेल्या 'टायगर बेबी' सिनेमासाठी निवडण्यात आलं आहे... यासिनेमात अभिनेता इशान खट्टर मुख्य भूमिकेत दिसेल असं देखील सांगण्यात येत आहे.'रिपोर्टनुसार, झोया अख्तरच्या नवीन निर्मिती असलेल्या 'टायगर बेबी' मध्ये सारा अर्जुनला कास्ट करण्यात आलं आहे. या सिनेमात ती इशान खट्टरसोबत दिसणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अर्जुन वरेन सिंग या प्रोजेक्टचे दिग्दर्शन करणार आहे.

***

## चर्चेत आली ही सीरिज, पाहताना अंगावर येतो काटा



सध्या जगभरात इराण आणि इस्रायल यांच्यात वाढत चाललेल्या तणावपूर्ण परिस्थितीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आकाशात उडणाऱ्या क्षेपणास्त्रांपासून ते जमिनीवरील संघर्षापर्यंत. दोन्ही देशांमधील वातावरण अत्यंत गंभीर बनले आहे. या पार्श्वभूमीवरच मनोरंजन क्षेत्रात एक नवी स्पाय-ड्रामा सीरिज चर्चेत आली असून तिने प्रेक्षकांमध्ये मोठी खळबळ उडवली आहे.इराणच्या सरकारी दूरदर्शनने नुकतीच 'नाइट लाइट' ही ड्रामा सीरिज प्रदर्शित केली आहे. ही सीरिज केवळ कथानकामुळेच नाही तर तिच्या राजकीय संदर्भामुळेही चर्चेत आहे. अनेकजण या सीरिजकडे तेहरान या लोकप्रिय इस्रायली शोला दिलेलं प्रत्युत्तर म्हणून पाहत आहेत.

या सीरिजमध्ये इस्रायलची गुप्तचर संस्था मोसादच्या महिला एजंटची कथा दाखवण्यात आली होती, जी इराणच्या सुरक्षा यंत्रणेत घुसखोरी करते. मात्र 'नाइट लाइट'ची कथा पूर्णपणे वेगळी दिशा दाखवते. या सीरिजमध्ये 'रामोस' नावाच्या परदेशी महिला गुप्तहेराला इराणमध्ये घुसखोरी करताना दाखवले आहे, ज्याचा उद्देश देशातील शांतता भंग करणे हा आहे. पण इथे नायक आहेत इराणी गुप्तचर अधिकारी, जे आपल्या हुशारीने आणि सतर्कतेने अशा परकीय कटकारस्थानांना हाणून पाडतात.

ही 30 भागांची मोठी सीरिज फारसी नववर्ष 'नवरोज'च्या निमित्ताने प्रदर्शित करण्यात आली आहे. इराणच्या मेहर न्यूज एजन्सीनुसार, या सीरिजची कथा काही अंशी वास्तविक घटनांवर आधारित असल्याचा दावा केला जात आहे. यात इराणी सुरक्षा यंत्रणांनी देशातील गुप्तहेर नेटवर्क आणि तोडफोडीच्या कारवाया कशा उधळून लावल्या हे दाखवण्यात आले आहे. या सीरिजच्या रिलीजच्या वेळेबाबत तज्ज्ञांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सध्या इराण आणि इस्रायल यांच्यात तणावपूर्ण, युद्धासारखी परिस्थिती निर्माण झाली असताना अशा प्रकारच्या सीरिजचे प्रदर्शन हे केवळ योगायोग नसल्याचे मत व्यक्त केले जात आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर अशा कथा प्रेक्षकांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण करण्यास मदत करतात, असेही विश्लेषक सांगतात.

गेल्या काही दिवसांत इराणमध्ये इस्रायल आणि अमेरिकेसाठी हेरगिरी करणाऱ्यांच्या अटकांची प्रकरणे वाढल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. अशा वेळी 'नाइट लाइट'सारखी सीरिज एक स्पष्ट संदेश देते—इराणी भूमीत घुसखोरी करणे अत्यंत कठीण आहे. ही सीरिज केवळ मनोरंजनापुरती मर्यादित नसून, जागतिक पातळीवर इराणची प्रतिमा एक मजबूत आणि सुरक्षित राष्ट्र म्हणून मांडण्याचा प्रयत्न असल्याचेही मानले जात आहे.

## बॉलिवूडमधल्या यशाबद्दल काय म्हणाली तृप्ती डिमरी ?



प्रेमाबद्दल प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असतो. प्रत्येक जण त्याकडे आपापल्या पद्धतीनं पाहतो. मी खऱ्या प्रेमावर विश्वास ठेवते. प्रेम आपल्या प्रत्येकाच्या अंतरंगात असतं. ज्याच्यावर आपण प्रेम करू शकत नाही, त्याच्याबद्दल तिरस्कारही निर्माण होत नाही; कारण प्रेम आणि द्वेष या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जिथे भावना खोल असतात, तिथेच प्रेमाचा आणि रागाचाही उगम होतो. सर्वांत प्रामाणिक भावना जर कुठली असेल, तर ती प्रेमच, कारण प्रेम असतं तेव्हा आपण खऱ्या अर्थानं जिवंत असतो. आजपर्यंतच्या कलाप्रवासात कलाकार म्हणून तुलापूर्वीची मी आणि आताची मी; याचा विचार केला की जाणवतं; कलाकार म्हणून माझं काम म्हणजे जीवनाचं प्रतिबिंब पडद्यावर उमटवणं. म्हणून मी बदलत राहणं आवश्यक आहे; कारण बदल थांबला, की सर्जनशीलता थांबते. उत्तराखंडमधून दिल्लीत येऊन संघर्ष केला. त्यानंतर तिथून स्वप्ननगरी मुंबईत आले; इथवरच्या प्रत्येक टप्प्यानं मला नव्यानं घडवलं. प्रत्येक सिनेमा, प्रत्येक भूमिका या केवळ करिअरच्या पायऱ्या नव्हत्या, तर आत्मशोधाचा प्रवास होता. एक स्त्री म्हणूनही मी अधिक संयमी, संवेदनशील होत गेले. या प्रवासानं मला शिकवलं, की वंश क्षणिक असतं, पण शिकणं अखंड असतं. उमेदीच्या दिवसांत मी वर्षाला एखादा सिनेमा करत होते. तीन वर्षांत केवळ तीन सिनेमे केले. मात्र 'ॲनिमल'च्या यशानंतर माझ्याकडे सिनेमांची रांग लागली. २०२४ या एकाच वर्षात मी 'बंड न्यूज', 'विकी विद्या का वो वाला व्हिडीओ' आणि 'भूलभुलैय्या ३' या सिनेमांमध्ये दिसले. आता 'ओ रोमियो' बरोबरच 'स्पिरिट आणि 'माँ बहन' सारख्या सिनेर्मामध्ये काम केलं आहे. प्रत्येक टप्प्यावर नवं काहीतरी शिकण्याचा मी प्रयत्न करतेय. नकार आणि प्रतीक्षेच्या दीर्घ टप्प्यानंतर आज विविधांगी सिनेमांसाठी मला विचारलं जातंय. माझ्यासाठी ही खूप आनंदाची गोष्ट आहे. खरं तर प्रत्येक दुसरा सिनेमा माझ्याकडे यावा, असे मला वाटतं, कारण मी कित्येक 'नकार' हसऱ्या चेहऱ्यानं स्वीकारले आहेत. हातात काम नव्हतं; तेव्हा मी स्वतःला कधी अपयशी मानलं नाही. ऑडिशनला जाण्यातही एक वेगळाच आनंद होता. आजच्या यशाचा आनंद वेगळा आहे. खरं सांगायचं, तर ते दिवस पाहिले नसते, तर कदाचित माझ्या उंचावणाऱ्या करिअरची किंमत मला जाणवली नसती.शाहिदसोबत काम करण्याचा अनुभव समृद्ध करणारा ठरला. त्याच्यातली भावलेली गोष्ट म्हणजे त्याच्या मनात असलेली 'माणुसकी'ची भावनाः जी आजच्या स्पर्धात्मक जगात हळूहळू दुमौळ होत चालली आहे.

तो केवळ उत्कृष्ट अभिनेता नाही, तर समोरच्याच्या भावना ओळखणारा सहकलाकार आहे. अनेकदा शब्दांचीही गरज भासत नाही; कारण तो न बोलताही मनातलं टिपतो. सेटवर त्याची ऊर्जा, शिस्त आणि एकाग्रता प्रेरणादायी असते, पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे तो प्रत्येकाचा आदर करतो.

# दुसरबीड विकासापासून वंचित? ग्रामसचिवालयात पंतप्रधानांची प्रतिमा देत भाजपा पदाधिकाऱ्यांचा सवाल!

**जनसंचलन/बुलढाणा**



गाव अजूनही विकासाच्या प्रतीक्षेतच का? असा थेट आणि आक्रमक सवाल उपस्थित करत सिदखेड राजा तालुका भाजप पदाधिकाऱ्यांनी ग्रामसचिवालयात जोरदार उपस्थिती लावली. दिनांक २५ रोजी ग्रामसचिवालय, दुसरबीड येथे देशाचे पंतप्रधान यांची प्रतिमा सप्रेम भेट देत आता तरी विकास कामांना गती द्याफ्र असा स्पष्ट इशारा देण्यात आला. या वेळी तालुका उपाध्यक्ष सुरेश बुलकडे, अल्पसंख्यक जिल्हा महामंत्री शेख जावेद, एससी सेलचे जिल्हा महामंत्री नानासाहेब तौर, तसेच गजानन सोनवणे आणि शेख फय्युम यांनी प्रशासनाला जाब विचारला. केंद्र सरकार योजना देते, पण स्थानिक पातळीवर अंमलबजावणी का होत नाही?फ्र असा संतप्त सवाल उपस्थित करण्यात आला. कार्यक्रमावेळी ग्रामविकास अधिकारी अशोक बनकर, ग्रामप्रशासक, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, प्रतिमा देऊन नव्हे तर काम करून दाखवाफ्र अशी ग्रामस्थांमध्येही जोरदार चर्चा रंगली असून, दुसरबीडच्या विकासाचा मुद्दा आता पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# पेट्रोल-डिझेल टंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवू नका

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

**जनसंचलन/ बुलढाणा**



सोशल मीडियावर सध्या पेट्रोल आणि डिझेलच्या तुटवड्याबाबत पसरत असलेल्या अफवांमुळे जिल्ह्यात ठिकठिकाणी पेट्रोल पंपांवर नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी पेट्रोलियम नियम २००२ मधील तरतुदींचा वापर करून कडक निर्बंध लागू केले आहेत. जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही, असे स्पष्ट करत जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश निर्गमित केले आहेत.

खुले इंधन विक्रीवर बंदी: कोणत्याही पेट्रोल पंपावर पेट्रोल किंवा डिझेल प्लास्टिक बाटल्या, कॅन, डबे किंवा अनधिकृत कंटेनरमध्ये भरून देण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. इंधन केवळ वाहनांच्या टाकीतच भरून दिले जावे.

अत्यावश्यक सेवांना प्राधान्य: रुग्णवाहिका () आणि इतर अत्यावश्यक सेवांशी संबंधित वाहनांना इंधन पुरवठा करताना प्राधान्य देण्याच्या सूचना पंप चालकांना देण्यात आल्या आहेत.

साठ्याची पारदर्शकता: प्रत्येक पेट्रोल पंपाने दररोजचा उपलब्ध साठा आणि मागणीची माहिती फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.


सीसीटीव्ही देखरेख: सर्व पेट्रोल पंप परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवावी आणि विक्रीच्या नोंदी नियमित अद्ययावत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांविरुद्ध पेट्रोलियम नियम २००२, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत कठोर फौजदारी कारवाई करण्यात येईल. वाहनांमध्ये अनावश्यक साठा करून कृत्रिम टंचाई निर्माण करू नये. प्रशासनाला सहकार्य करावे आणि अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# जनगणना २०२७ साठी तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिरास उत्साहात सुरुवात

**जनसंचलन/बुलढाणा**

जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नसून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणे आखण्याचा मूलभूत पाया आहे. त्यामुळे प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याने नियमावलीचे काटेकोर पालन करत अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह माहिती संकलित करण्यावर भर द्यावा, असे प्रतिपादन प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर, जनगणना संचालनालय व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, सहायक संचालक अजय ठाकूर, सांख्यिकी अन्वेषण विशाल दिवेकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी नमूद केले की, जनगणना प्रक्रियेत वेळेचे आणि अचूकतेचे विशेष महत्त्व आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रशिक्षणार्थ्यांनी इन्स्ट्रक्शन मॅन्युअलचा सखोल अभ्यास करावा आणि आपल्या शंकांचे वेळीच निरसन करून घ्यावे. हे प्रशिक्षण टॉप-टू-बॉटम सर्व घटकांसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, यामुळे सक्षम आणि जबाबदार मनुष्यबळ तयार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या या विशेष प्रशिक्षण शिबिराला आजपासून उत्साहात सुरुवात झाली आहे.प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे. या शिबिरातून सक्षम, सजग आणि जबाबदार मनुष्यबळ तयार होऊन आगामी जनगणना अधिक प्रभावीपणे राबविता येईल. प्रशिक्षणादरम्यान जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने समजावून सांगण्यात आली. डिजिटल साधनांचा वापर, मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलन, डेटा एंट्रीतील अचूकता आणि माहितीची गोपनीयता राखण्याचे नियम यावर विशेष भर देण्यात आला. तसेच प्रत्यक्ष क्षेत्रात येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञ मार्गदर्शकांनी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रशिक्षण अधिक प्रभावी केले. प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष सरावाची संधी देण्यात आली. विविध परिस्थितींमध्ये कसे कार्य करावे, याचे मार्गदर्शन करण्यात आले. सहभागींच्या शंकांचे निरसन करण्यात आले.



# माहिती अधिकाराचे हि धंदे मी करत नाही, घरात चौकशी करा!आमदार संजय गायकवाडांची श्वेताताई महालेंवर जहरी टीका, म्हणाले, पाठीत खंजीर खुपसणे आम्हाला...

जनसंचलन/ चिखली

चिखली मतदारसंघात महायुतीतील अंतर्गत संघर्ष आता उघडपणे पेटला असून, संजय गायकवाड यांनी भाजप आमदार श्वेता महाले यांच्यावर अत्यंत जहरी आणि खालच्या स्तरावरील शब्दांत टीका करत राजकीय वादाला चांगलाच तडका दिला आहे. माहिती अधिकाराच्या नावाखाली दबाव टाकण्याचे हि धंदे मी करत नाही, ते कोण करतंय हे तुमच्या घरात चौकशी करा,असा थेट आणि वादग्रस्त टोला लगावत गायकवाड यांनी आ.महालेंवर जोरदार हल्ला चढवला. त्यांच्या या वक्तव्यामुळे चिखलीतील राजकीय वातावरण अक्षरशः तापलं आहे. वादाची ठिणगी तेव्हा पडली, जेव्हा महाले यांनी गायकवाडांवर गंभीर आरोप करत म्हटलं की, ते  चा धाक दाखवून सरपंच आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांवर दबाव टाकतात आणि पक्षवाढ करतात. या आरोपांना प्रत्युत्तर देताना गायकवाड आक्रमक झाले. आमचं काम सरळ आहे, छातीला छाती भिडवून राजकारण करायचं. पाठीत खंजीर खुपसणं आम्हाला जमत नाही,असा इशारा देत त्यांनी महालेंच्या कार्यपद्धतीवरही अप्रत्यक्ष निशाणा साधला. पुढे ते म्हणाले, ङ्कचिखलीत माझे नातेवाईक आहेत, पण माझ्याबद्दल चांगली पोस्ट केल्यावर त्यांना धमकावलं जातं. शिवसैनिकांनी भाजप आमदारांना वारंवार निवडून आणलं, पण आता आमच्या कार्यकर्त्यांनाच पक्ष बदलण्याचा दबाव टाकला जातो. इतक्यावरच न थांबता गायकवाड यांनी थेट आव्हान देत म्हटलं, ङ्ककोणाला जेलमध्ये टाकणार, कोणाला धमकावणार हे आता आम्हीही पाहणार आहोत. मी घरात बसणारा आमदार नाही; संपूर्ण महाराष्ट्रात माझं नाव आहे.फ्र महायुतीतील हा संघर्ष आता उघड रणांगणात उतरला असून, येत्या काळात चिखलीत राजकीय समीकरणे



अधिकच ढवळून निघण्याची चिन्हे दिसत आहेत.

# चिखलीत सिनेस्टाईल पाठलाग!

## खुनातील आरोपी जेरबंद; तरुणाला ५० मीटर फरपटत नेल्याचा धक्कादायक खुलासा




जनसंचलन/बुलढाणा

चिखली तालुक्यातील केळवद परिसरात घडलेल्या थरारक हल्ल्याने संपूर्ण जिल्हा हादरवला असतानाच, चिखली पोलीस यांनी अवघ्या काही तासांत सिनेस्टाईल पाठलाग करत दोन आरोपींना जेरबंद करत प्रकरणाचा पर्दाफाश केला आहे. विशेष म्हणजे, सुरुवातीला केवळ मारहाणीचा गुन्हा वाटणाऱ्या या घटनेने आता खुनाचे भीषण रूप घेतले आहे. दिलेल्या बातमीनुसार, केळवदजवळील हॉटेल गुलमोहर परिसरात स्विफ्ट डिझायरमधून आलेल्या टोळक्याने गणेश भागवत गुडडा यांच्यावर जीवघेणा हल्ला केला होता. डोक्यावर काठीने प्रहार करत त्यांना गंभीर जखमी करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्यानंतर या प्रकरणाने अधिकच गंभीर वळण घेतले. तपासादरम्यान धक्कादायक बाब समोर आली की आरोपींनी गणेश यांना केवळ मारहाणच केली नाही, तर गाडीच्या दरवाज्यात अडकवून तब्बल ५० मीटर फरपटत नेले! या अमानुष कृत्यामुळेच त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तीन विशेष पथके तयार करून तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचला. बोथाकाजी परिसरात संशयित स्विफ्ट डिझायर दिसताच पोलिसांनी पाठलाग सुरू केला. आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र थरारक चेसनंतर त्यांना पकडण्यात यश आले. अटक करण्यात आलेले आरोपी शेख शाहरुख शेख प्यारु (३१) व सुप्रबुद्ध महादेव हिवराळे (३३) रा. बोथाकाजी, ता. खामगाव असून त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. न्यायालयाने त्यांना ३० मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४